**<u>मोटार अपघात दावा अर्ज क्र. ३६/२०२५</u>**

**<u>निशाणी क्र. ३६ खाली</u>**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २ यांची साक्ष</u>**

**मी शपथेवर कथन करतो की –**

माझे नाव – उत्कर्ष विजय शिंदे

वय – ३२ वर्षे,

धंदा – नोकरी,

रा. – उमा नगरी, मुरारजी पेठ, सोलापूर.

**<u>सरतपास अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री. आर.सी. महिंद्रकर यांचेतर्फे सुरु.</u>**

मी सोलापूर प्राईड आय.सी.यु. मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल येथे प्रशासकीय अधिकारी म्हणून डिसेंबर २०२२ पासून कार्यरत आहे. मी साक्षी समन्सप्रमाणे साक्षीला आलेलो आहे. त्याप्रमाणे मला अधिकारपत्र देण्यात आलेले आहे. (आता साक्षीदाराला यादी निशाणी क्र. ३५/१ वरील अधिकारपत्र दाखविण्यात आले.) त्यावर प्रशांत दौंड यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. (सदर अधिकारपत्र **निशाणी क्र. ३७** वर आहे.)

२. अर्जदार सुशिला बाळू भालेराव हया आमच्या दवाखान्यामध्ये दि.२८.११.२०२४ रोजी भरती झाल्या होत्या. दि.०६.१२.२०२४ रोजी त्यांचा डिस्चार्ज झालेला होता. (आता साक्षीदाराला यादी निशाणी क्र. ३५/२ वरील डिस्चार्ज समरी दाखविण्यात आली.) त्यावर एम.आर.डी. डिपार्टमेंटचे एक्झीक्युटिव्ह श्री. आदेश नागटिळक यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. (सदर दस्त **निशाणी क्र.३८** वर आहे.)

३. अर्जदार यांचे आमच्या दवाखान्याचे बिल रु.१,२५,५५०/– झाले होते. त्यांना रु.१७,८६०/– डिस्काऊंट देण्यात आला होता. त्याप्रमाणे रु.१,०७,६९०/– हे त्यांचे अंतिम बिल होते. सदर रक्कम त्यांनी आमच्या दवाखान्यात अदा केलेली आहे. (आता साक्षीदाराला यादी निशाणी क्र.३५/३ वरील अंतिम देयक दाखवण्यात आले.) त्यावर एम.आर.डी. डिपार्टमेंटचे एक्झीक्युटिव्ह श्री. आदेश नागटिळक यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. (सदर देयक **निशाणी क्र. ३९** वर आहे.)

४.	(आता साक्षीदाराला यादी निशाणी क्र. ३५/३ वरील एकूण ४ बिले दाखविण्यात आली.) सदर बिले तपासणीची आहेत. त्याची रक्कम रु.२९,९१०/– इतकी आहे. ती रक्कम आम्हाला मिळालेली आहे. त्यापैकी अ.क्र.१ ते ३ वर प्रशांत गायकवाड यांची सही आहे व अ.क्र. ४ वर आदेश नागटिळक यांची सही आहे. त्या सहया मी ओळखतो. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. (सदर बिलांना एकत्रित **निशाणी क्र.४०/१ ते ४०/४** देण्यात येतात.)

५.	(आता साक्षीदाराला यादी निशाणी क्र.३५/४ वरील औषधी दुकानाचे स्टेटमेंट दाखवण्यात आले.) त्यावर फार्मासिस्ट सोहेल फुलमामडी यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. अर्जदाराचे औषधी दुकानाचे बिल हे रक्कम रु.९८,९०२/– इतके झाले. सदर रक्कम आम्हाला मिळालेली आहे. (सदर बिलास **निशाणी क्र.४१** देण्यात येते.)

**<u>सामनेवाला क्र.१ आणि त्यांच्यातर्फे विधिज्ञ कोणीही हजर नसल्याने, त्यांच्यातर्फे उलटतपास नाही.</u>**

**<u>उलटतपास सामनेवाला क्र. २ तर्फे विधिज्ञ श्री.एम.व्ही. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु</u>**

६.	माझी डयुटी ही दवाखान्यातील सर्व विभागाशी समन्वय साधणे अशी आहे. आमच्या दवाखान्यात एकूण २१ डॉक्टरस् भेट देतात. मी प्रत्येकांना वैयक्तीक नावानिशी ओळखतो. आमच्या दवाखान्यात जवळपास ११० नर्स आणि इतर स्टाफ आहेत. आमच्या दवाखान्यातील सर्व विभागांना त्यांची–त्यांची कामे वाटून दिलेली आहेत. हे खरे नाही की, त्यामुळे संबंधित विभागामध्ये कोण–कोणाला भेटतात याबाबत मला माहिती नाही. हे खरे नाही की, आमच्या दवाखान्यात दररोज किती रुग्ण भरती होतात, किती रुग्णांना डिस्चार्ज दिला जातो आणि त्यांना काय उपचार दिला जातो, याबाबत मला माहिती नाही.

७.	हे खरे नाही की, मी प्रत्येक रुग्णाला नावानिशी ओळखत नाही. प्रत्येक रुग्णाला काय उपचार दयायचा, याबाबत मला डॉक्टर सल्लामसलत करत नाहीत आणि मी देखील त्यांच्या केस पेपरवर काऊंटर सही करत नाही. हे खरे आहे की, त्यामुळे प्रत्येक रुग्णाला काय उपचार दिला जातो याबाबत मला माहिती

नाही. रुग्णाच्या ॲडमिशन कार्ड आणि डिस्चार्ज कार्डवर माझी सही नसते. मी रुग्णाचे ॲडमिशन आणि डिस्चार्जचे काम स्वत: करत नाही. बिल देणे–घेणेसाठी आमच्या दवाखान्यात कॅश काऊंटर आहे. हे खरे आहे की, मी कॅश काऊंटरला नसल्याने मी स्वत: बिल घेतलेले नाही. (साक्षीदार स्वत:हून सांगतात की, रुग्णाचे नातेवाईक डिस्काऊंटसाठी माझेकडे येतात, त्यामुळे मला याबाबत माहिती आहे.)

प्रश्न – रुग्णाचे नातेवाईक तेच आहेत हे कशावरुन ?

उत्तर – रुग्णाच्या नातेवाईकाशिवाय दुसरे कोणी कशाला येतील.

८. हे खरे आहे की, नातेवाईकाशिवाय इतर लोकदेखील डिस्काऊंटसाठी माझेकडे येऊ शकतात. अर्जदाराचे बिल घेऊन माझेकडे कोणता नातेवाईक आला होता हे मला सांगता येत नाही. हे खरे आहे की, बिलावर रक्कम अदा करणाऱ्याचे नाव नमूद नाही. हे खरे नाही की, त्यामुळे बिलाची रक्कम कोणी भरली हे मला माहित नाही. प्रशांत गायकवाड आणि आदेश नागटिळक हे सोलापूरात आहेत आणि ते साक्षीला येऊ शकतात.

९. औषध दुकानाच्या बिलाचे जे मी स्टेटमेंट निशाणी क्र.४१ वर दाखल केले आहेत, त्याची मूळ बिले मी सोबत आणली आहेत. (साक्षीदाराने सदर बिल काढून दाखवले.) सदर बिल मी प्रस्तुत प्रकरणात दाखल करु शकतो. साक्षीदाराने सदर बिले दाखल केली आहेत. (सदर यादीला **निशाणी क्र. ४२** आणि बिलांना एकत्रित **निशाणी क्र. ४३** देण्यात येतात.) या बिलांवर फार्मासिस्ट आणि आदेश नागटिळक यांच्या सहया आहेत. या बिलांवर रक्कम दिल्याबाबत संबंधित नातेवाईकांच्या सहया नाहीत. हे खरे आहे की, आमच्या दवाखान्यातील बिलाची रक्कम माझेसमक्ष देण्यात आलेली नाही. हे खरे नाही की, अर्जदाराला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे आहे की, मी आज दाखल केलेल्या कागदपत्रांवर माझी सही नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Digitally signed by PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Date: 2026.07.16 17:18:00 +0530

दिनांक – १६/०७/२०२६

**(ओमशंकर शिवराज पाटील)**

तदर्थ जिल्हा न्यायाधीश – २, सोलापूर.